महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये
क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह साजरा करणे.
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निवियो २०१९/प्र.क्र.१९४/क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २६ ऑगस्ट, २०१९.

वाचा:-

१) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो १०९६/ प्र.क्र.३३०/ क्रीयुसे-१ दि. ३१ जुलै, १९९७.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक अनुवि ४९१९/(३२/१९) अर्थसंकल्प, दिनांक ०४ एप्रिल, २०१९
३) क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक.निधी वितरण/योजना-१७३८/२०१८-१९/का-१०/८१३ दि. ०३ जून, २०१९.

प्रस्तावना : -

महाराष्ट्र राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दि. १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यांत येतो. यामध्ये विविध क्रीडाविषयक उपक्रम, स्पर्धा, खेळाडूंचा सत्कार, चर्चासत्रे, प्रदर्शने इ. चा समावेश होतो. तसेच केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस (२९ ऑगस्ट) हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यामध्ये मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कार्यक्रमाचे/ व्याखानाचे आयोजन, क्रीडा विषयक शास्त्रोक्त माहिती, क्रीडा विषयक उपक्रम, रोडरेस /सायकल शर्यती इ. चे आयोजन करण्यात येते. सदर राष्ट्रीय क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह या बाबींकरीता शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो १०९६/ प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१ दि. ३१ जुलै, १९९७ अन्वये आर्थिक सहाय्य देण्यात येते.

सन २०१९-२० या कालावधीत प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.३.५० लक्ष इतक्या तरतुदीपैकी रु. १.१७ लक्ष इतक्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब या नस्तीच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या वर्षाकरीता महाराष्ट्र राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा सप्ताह व मेजर ध्यानचंद यांना जन्मदिवस साजरा करण्यांत येतो. यासाठी रु. ३.५० लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकानुसार रु.१.१७ लक्ष तरतूद

वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०४, (२५)(०१) महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा सप्ताह साजरा करणे(कार्यक्रम) (२२०४ १७३८)-५० इतर खर्च (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

I) उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्याचेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आहंरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II) राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करून वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह साजरा करणे निधी वितरीत करतांना मूळ शासन निर्णयामधील अटी व शर्ती लागू राहतील.

४. शासनाच्या सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत उपसंचालक/जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२६११२९४८३६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.26 11:41:43 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा)यांचे खाजगी सचिव

२. मा.अवर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९. वरीष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०.निवडनस्ती, क्रीयुसे-३